सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# कार्यक्रम अंदाजपत्रक

## २०२५-२०२६

## वित्त विभाग

## (संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा)

(प्रकाशन क्रमांक ६)

*

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

२०२५

# कार्यक्रम अंदाजपत्रक

## २०२५-२०२६

## वित्त विभाग

## संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा

(प्रकाशन क्रमांक ६)

## वित्त विभाग – कार्यक्रम अंदाजपत्रक

| | |
|---|---|
| १ | वित्त विभाग, मंत्रालय |
| २ | संचालनालय, लेखा व कोषागारे |
| ३ | वस्तू व सेवाकर विभाग |
| ४ | महाराष्ट्र राज्य लॉटरी |
| ५ | विमा प्रशासन संचालनालय |
| ६ | संचालनालय, स्थानिक निधी लेखा परीक्षा |

# अनुक्रमणिका



| प्रकरण क्रमांक | शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | प्रस्तावना | (सात) |
| १ | विकासाचा संक्षिप्त दृष्टीक्षेप | १ |
| २ | संस्थात्मक रचना | २ |
| ३ | कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या | ३ |
| ४ | आर्थिक वर्ष २०२५-२६ साठीच्या कामाचा आढावा | ६ |
| ५ | ई-गव्हर्नन्सच्या दिशेने | ९ |
| ६ | परिशिष्ट | |
| | परिशिष्ट १ : अर्थसंकल्पीय तरतूद सन २०२५-२६ | ११ |
| | परिशिष्ट २ : पदनिहाय विवरणपत्र | १२ |
| | परिशिष्ट ३ : कार्यरत महिला अधिकारी/कर्मचारी यांची सांख्यिकीय माहिती दर्शविणारे विवरणपत्र | १३ |

## प्रस्तावना

"**उत्तरदायित्व आणि पारदर्शकता**" या लोकशाही व्यवस्थेतील सुशासनाच्या दोन मुख्य तत्त्वांचे पालन हे सार्वजनिक लेखापरीक्षणाचे कार्य किती चांगल्या प्रकारे पार पाडले जाते यावर अवलंबून असते.

**श्री. विनोद राय, माजी नियंत्रक व महालेखापाल, भारत**

स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय हे महाराष्ट्र राज्यातील पंचायती राज संस्था व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाचे मुख्य लेखापरीक्षक आहेत. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनयम, १९३० च्या कलम (३) (एक)(अ) अन्वये संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा विभाग यांना " संवैधानिक मुख्य लेखापरीक्षक " म्हणून घोषित केले आहे. ज्यांना मुख्यतः महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० व तत्संबंधीचे सुधारित नियम व अधिनियमाद्वारे लेखापरीक्षण करणे व तदनुषंगिक कार्य करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या व्यतिरिक्त संचालनालयाकडे अनेक प्रमुख संस्थांचे लेखापरीक्षण सोपविण्यात आले आहे. ज्यामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्रातील चार कृषि विद्यापीठे (अंतर्गत २५६ संस्था), एक पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ (अंतर्गत १६ संस्था) आणि २२८ विविध संकीर्ण संस्थांचा समावेश होतो. अशाप्रकारे संचालनालयाच्या लेखापरीक्षणाचा विस्तार आजतागायत २८९८९ संस्थांपर्यंत वाढला आहे. यामध्ये पंचायती राज संस्था अंतर्गत ३४ जिल्हा परिषदा, ३५१ पंचायत समिती, २७९४४ ग्रामपंचायतीचा समावेश होतो. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये १४५ नगरपंचायती, २४७ नगरपालिका, २९ महानगरपालिका, ६ महानगरपालिका परिवहन उपक्रम इत्यादींचा समावेश होतो, तर संकीर्ण संस्था अंतर्गत ४ कृषि विद्यापीठे, १ महाराष्ट्र राज्य पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ व इतर २२८ संकीर्ण संस्थांचा समावेश होतो.

स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाअंतर्गत एकूण १४२० पदे मंजूर असून त्यापैकी ९४५ पदे भरलेली आहेत. उपलब्ध पदांनुसार जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, नगरपालिका, नगरपंचायती, संकीर्ण संस्था व कृषि विद्यापीठे यांना लेखापरीक्षणाचे एकूण १,१६,६८३ श्रमदिन मंजूर करण्यात आलेले आहेत.

लेखापरीक्षणाच्या उद्देशाप्रमाणे स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय हे लेखापरीक्षण करीत असलेल्या संस्थांच्या कामकाजाबाबत अपहार, गैरव्यवहार व दुर्विनियोग निदर्शनास आणून देऊन त्या संस्थामध्ये कार्यक्षमता, जबाबदारी व पारदर्शकता आणण्यासाठी आपली भुमिका बजावते. संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाद्वारे निर्गमित अहवालात सन २०२३-२४ करीता १३९२ अपहार प्रकरणे तर सन २०२४-२५ करीता माहे सप्टेंबर, २०२४ पर्यंत ९७१ अपहार प्रकरणे नोंदविण्यात आलेली असून त्यात कोट्यावधीची रक्कम गुंतलेली दिसून येते.

नियमित लेखापरीक्षण अहवालातील महत्वाच्या मुद्दयांच्या आधारे संचालनालयामार्फत पंचायत राज समितीसमोर सादर होणेसाठी लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवाल तयार करण्यात येतो. स्थानिक स्वराज्य संस्थांचे कामकाज प्रभावीपणे राबविण्यासाठी या अहवालाची समितीस मदत होते.

स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाने देखील महाराष्ट्र शासनाच्या ई-गव्हर्नन्स धोरणाद्वारे ठरवून दिलेली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी त्यांचे प्रचलित कार्यपद्धतीचे आधुनिकीकरण करून स्वतःला अधिक कार्यक्षम व मजबूत करण्याचा प्रयत्न केला आहे. यानुषंगाने लेखापरीक्षणाचे कामकाज अधिक कार्यक्षमतेने होण्यासाठी संचालनालयाने MAINS (महाराष्ट्र ऑडिट इन्फॉर्मेशन नेटवर्क सिस्टीम) नावाची वेब आधारित प्रणाली विकसित केली आहे. ज्यामध्ये जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, नगर परिषदा, नगरपंचायती, व महानगरपालिका यांची लेखापरीक्षणाच्या नियोजनाच्या टप्प्यापासून अहवाल निर्गमित करण्यापर्यंतची प्रक्रिया स्वयंचलित केली आहे. त्याचप्रमाणे वार्षिक लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालाच्या संकलनासाठी RAR (Review Audit Report) नावाचे पोर्टल विकसित केले आहे.

स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय हे कर्मचारी व अधिकारी यांची कार्यक्षमता व गुणवत्ता वाढवून त्यांना सक्षम करण्याच्या दृष्टीने राज्यातील विविध प्रशिक्षण संस्थांमार्फत विविध ऑनलाईन आणि ऑफलाईन प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करते. भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक कार्यालयाकडून स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयास प्रभावी कामकाजासाठी वेळोवेळी तांत्रिक मार्गदर्शन प्राप्त होते. तसेच विविध वित्त आयोगाच्या शिफारशी आणि मार्गदर्शक तत्त्वांनी स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयास लेखापरीक्षण पद्धती आणखी सुधारण्यास आणि प्रमाणित करण्यास मदत केली आहे.

मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३०, त्यानंतरच्या सुधारणा आणि महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखापरीक्षण नियम, १९६१ मधील तरतुदी अंतर्गत समाविष्ट असलेल्या संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी कोणतेही लेखापरीक्षण शुल्क आकारले जात नाही. तथापि ६९ संकीर्ण संस्थांच्या लेखापरीक्षणाकरिता शासन निर्देशान्वये शुल्क निर्धारीत करण्यात आले असून त्यानुसार सन २०२३-२४ करीता रुपये १,४२,६९,३५६/- व सन २०२४-२५ मध्ये माहे सप्टेंबर २०२४ पर्यंत रक्कम रुपये ३५,०९,९१९/- इतके लेखापरीक्षण शुल्क शासन खाती जमा होणे अपेक्षित आहे.

पंचायती राज मंत्रालय, भारत सरकार यांच्या शिफारशीनुसार सन २०२०-२१ या आर्थिक वर्षापासून १४ व्या व १५ व्या वित्त आयोगांतर्गत ग्रामपंचायतीना प्राप्त झालेल्या अनुदानाचे लेखापरीक्षण करण्याकरिता AOL( Audit Online System ) या संगणक प्रणालीचा महाराष्ट्र राज्याने स्वीकार केला आहे. त्यानुषंगाने संचालनालयाने **सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरिता १४ व्या व १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत प्राप्त अनुदानाचे ९९.१०% ग्रामपंचायत लेखापरीक्षण AOL(Audit Online System) संगणक प्रणालीवर पूर्ण केले आहे. तसेच सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरिता ३७.३० % ग्रामपंचायत लेखापरीक्षण AOL(Audit Online System) संगणक प्रणालीवर माहे डिसेंबर, २०२४ पर्यंत पूर्ण केले आहे.**

स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाच्या कक्षेतील संस्थांव्यतिरिक्त अन्य संस्थांचे, योजनांचे लेखापरीक्षण करण्याची जबाबदारी शासनामार्फत वेळोवेळी या विभागावर सोपविण्यात येत असते. तसेच महाराष्ट्र शासनाच्या कक्षेत असलेल्या विविध संस्थांचे, आवश्यकता असेल तेव्हा विशेष लेखापरीक्षण करण्यासाठी स्थानिक निधी लेखपरीक्षा संचालनालयास शासनाकडून प्राधिकृत करण्यात येते. ही बाब केवळ लेखापरीक्षक म्हणून स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाची विश्वासार्हताच नाही तर वर्तमान संदर्भात तिची वाढती भूमिका देखील अधोरेखित करते.

स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाच्या लेखापरीक्षणाची व्याप्ती सतत विस्तारत असून पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नसताना देखील संचालनालयाने शासकीय लेखापरीक्षण क्षेत्रात व्यावसायिक मानके आणि कौशल्य प्रदर्शित करण्याचा प्रयत्न केला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेचे वैधानिक लेखापरीक्षक म्हणून संचालनालय केवळ पहारेकरी म्हणून काम करत नाहीत तर त्यांच्यासाठी एक मित्र, तत्त्वज्ञ आणि मार्गदर्शक म्हणून काम करते.

**निलेश राजूरकर,**
संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई.

## प्रकरण १

## विकासाचा संक्षिप्त दृष्टीक्षेप

भारतातील पंचायती राज संस्था सत्तेचे विकेंद्रीकरण व लोकसहभागासह तळागाळातील लोकशाहीची कल्पना करते. आधुनिक काळात विविध घडामोडीतून स्थानिक स्वराज्य संस्थेचा विकास झाला ज्याची सुरुवात लॉड मेयो यांच्या १८७० चा स्थानिक स्वराज्य संस्थेचा ठराव व लॉर्ड रिपॉनचा १८८२ चा ठराव, यांपासून झाली. ज्याला **"स्थानिक स्वराज्य संस्थांचा मॅग्ना कार्टा "** असेही म्हटले जाते, भारताची राज्यघटना राज्य धोरणांची निर्देशक तत्त्वांमध्ये कलम ४० नुसार राज्याला ग्रामपंचायती संघटीत करण्यासाठी पाऊले उचलण्याचे निर्देश देते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी करण्यात आलेले पूर्वीचे सर्व प्रयत्न आणि सुधारणांची परिणीती ७३ व्या व ७४ व्या घटना दुरुस्ती कायदा सन १९९२ मध्ये झाली.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासाबरोबरच त्यांच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करण्यासाठीच्या यंत्रणांचाही समांतर विकास झाला. अशा प्रकारे स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, महाराष्ट्राची सुरूवात महालेखाकार कार्यालय, यापासून सन १८८४ मध्ये मुंबईच्या बाह्य लेखापरीक्षण शाखेच्या स्वरुपात बदल होऊन विविध ऐतिहासिक टप्प्यांतून एक पूर्ण वैधानिक संस्था म्हणून विकसित झाली आहे. सन १८९४ मध्ये सिंध आणि उत्तर विभागातील नगरपालिकांचे लेखापरीक्षण या शाखेकडे सोपवण्यात आले. सन १९०७ मध्ये इतर नगरपालिका, जिल्हा स्थानिक मंडळे आणि कॅन्टोन्मेंट फंड (कटक मंडळ) यांचा समावेश करण्यासाठी शाखेची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्यांचा विस्तार करण्यात आला. सन १९१३ मध्ये विभागाची आणखी पुनर्रचना करण्यात आली आणि तालुका स्थानिक मंडळे, नागरी रुग्णालये यांचे लेखापरीक्षण सोपविण्यात आले ज्यामुळे ही शाखा स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाची खरी अग्रदूत बनली.

मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० ने स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाची व्याप्ती परीक्षक संस्था म्हणून अधिक मजबूत केली. ज्यामुळे स्थानिक संस्था, नगरपालिका, शाळा मंडळे आणि अधिसूचित क्षेत्र समित्यांसाठी अधिसूचना क्र. ७६२९, दि. २३ मार्च १९३१ व अधिसूचना क्र. ९२७०, दि. ०२ नोव्हेंबर १९३२ द्वारे मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखापरीक्षा वैधानिक लेखापरीक्षक बनले.

मुंबई शासन वित्त विभागाचे शासन निर्णय क्रमांक टीआरए -१६५७-८०५-सी-जी-३, दिनांक ३० एप्रिल १९५८ नुसार १९५८ मध्ये एक महत्त्वाच्या वाटचालीमध्ये हा विभाग भारताच्या नियंत्रक आणि महालेखापरीक्षकांच्या विभागाकडून दिनांक ०१ मे १९५८ पासून राज्य सरकारच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आला. मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा (विस्तार आणि सुधारणा) अधिनियम, १९६० पारीत होऊन स्थानिक निधी लेख्याची मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा म्हणून पुनर्रचना केली. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर ०१ जानेवारी १९६२ पासून स्थानिक निधी लेखापरीक्षा विभाग नव्याने निर्माण झालेल्या संचालनालय, लेखा व कोषागारे अंतर्गत आणण्यात आला.

ग्रामपंचायत लेख्यांचे लेखापरीक्षण १९६४ पासून जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रातून स्थानिक निधी लेखापरीक्षा कक्षेत आणले गेल्याने विभागाची व्याप्ती वाढली आहे.

७३ व्या व ७४ व्या घटना दुरुस्ती कायद्याने पंचायती राज संस्था व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था बाबत विभागाची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्यांमध्ये लक्षणीय वाढ केली आहे. परिणामी त्यांच्या आर्थिक स्त्रोतांमध्येही लक्षणीय वाढ झाली, त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी स्वतंत्र संचालनालय निर्माण करणे आवश्यक झाले. त्यानुसार महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्र. सेवा प्र. २०.०८/ प्र.क्र. ७९/२/कोषा प्रशा-०३, दिनांक २८ मे २००८ अन्वये स्थानिक निधी लेखा परीक्षा संचालनालयाची निर्मिती करण्यात आली. तसेच शासन निर्णय क्र. सेवा प्र. २०.०८/ प्र.क्र. १९७/२/कोषा प्रशा-०३, दिनांक ०१ ऑगस्ट २००८ नुसार मुख्य लेखापरीक्षकांना संचालनालयाचे प्रमुख म्हणून घोषीत केले.

१३ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. स्थानिले-१०१०/प्र.क्र.२६ (ब) विमा प्रशा, दिनांक ३१ मार्च २०११ अन्वये महानगरपालिकेचे लेखापरीक्षण स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाकडे सोपविण्यात आले.

वित्त विभाग, शासन निर्णय क्र. सेवाप्र-२०११/प्र.क्र.७१/ कोषा.प्रशा-०३ दिनांक १८ एप्रिल २०११ अन्वये संचालनालयाचे **"स्थानिक निधी लेखा परीक्षा संचालनालय"** असे सुधारित नामाभिधान करण्यात आले आणि मुख्य लेखा परीक्षक, सह मुख्य लेखा परीक्षक, उपमुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ), उपमुख्य लेखापरीक्षक (कनिष्ठ) या पदांची अनुक्रमे संचालक, सहसंचालक, उपसंचालक, सहायक संचालक अशी पुनर्रचना करण्यात आली.

प्रकरण २


## संस्थात्मक रचना

महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली स्थानिक निधी लेखा परीक्षा संचालनालय कार्य करते. त्याचे मुख्य कार्यालय रायगड भवन, नवी मुंबई येथे असून संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा हे विभाग प्रमुख आहेत. कोकण, पुणे, नाशिक, छ.संभाजीनगर, अमरावती आणि नागपूर अशी सहा महसूल विभागांमध्ये सहा प्रादेशिक कार्यालये आहेत, ज्यांचे कार्यालय प्रमुख **'सह संचालक'** आहेत. तसेच ३४ जिल्हा कार्यालये कार्यरत आहेत. जिल्हा कार्यालयाचे प्रमुख **"सहाय्यक संचालक"** असतात. विभागप्रमुख या नात्याने संचालक हे त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील अधिनस्त कार्यालयांना लेखाविषयक बाबींविषयी सुधारणा सुचवितात. संचालनालयाकडून दरवर्षी विभागीय कार्यालयांची तसेच सहसंचालक विभागीय कार्यालयांद्वारे त्यांच्या अधिनस्त जिल्हा कार्यालयांची प्रशासकीय तपासणी केली जाते.

१३ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार शासन निर्णय वित्त विभाग सेवाप्र-२०१२/प्र.क्र. ९९/ कोषा (प्रशा-३), दिनांक २३ फेब्रुवारी २०१२ अन्वये महानगरपालिकांचे लेखापरीक्षण करण्यासाठी सहसंचालक (महानगरपालिका लेखापरीक्षण) नियंत्रणासाठी स्वतंत्र शाखा तयार करण्यात आली. सह संचालक (महानगरपालिका लेखापरीक्षण) यांच्या नियंत्रणाखाली तीन उपविभागांमध्ये महानगरपालिका लेखापरीक्षण विभाग कार्यरत आहेत. उप संचालक हे प्रत्येक उपविभागाचे प्रमुख आहेत.

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. सेवाप्र.२०२०/प्र.क्र.१४/कोषा(प्रशा-०३), दिनांक २२ डिसेंबर २०२१ नुसार स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाचा सुधारित आकृतिबंध मंजूर करण्यात आलेला आहे. त्यानुसार एकूण मंजूर पदे १४२० सुधारित करण्यात आलेली आहे. त्यापैकी लेखापरीक्षणासाठी ११०८ कर्मचारी उपलब्ध आहेत. तसेच प्रत्येक लेखापरीक्षकांस प्रतिवर्षी १८५ श्रमदिन उपलब्ध होतात.

**संघटनात्मकक रचनाः**



## प्रकरण ३

## कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या

**(अ) स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाची लेखापरीक्षणाविषयक कार्ये :**

(१) राज्यातील सर्व पंचायती राज संस्थांचे लेखापरीक्षण ज्यामध्ये जिल्हा परिषदा (३४), पंचायत समित्या (३५१) आणि ग्रामपंचायती (२७९४४) आहेत.

(२) राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखापरीक्षण ज्यामध्ये महानगरपालिका (२९), महानगरपालिका परिवहन उपक्रम (६), नगर परिषदा (२४७), नगर पंचायती (१४५) आहेत.

(३) कृषी विद्यापीठे (४) अंतर्गत २५६ संस्था, महाराष्ट्र पशुवैद्यकीय आणि मत्स्य विज्ञान विद्यापीठ (१) अंतर्गत १६ संस्था आणि इतर संकीर्ण संस्थांचे (२२८) लेखापरीक्षण करणे.

(४) मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा नियम, १९३१ मधील नियम क्र. १५ अंतर्गत वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३६/कोषा प्रशा ४, दिनांक ३० मे २०१७ नुसार विशेष लेखापरीक्षणाचे आदेश देण्यापूर्वी घ्यावयाच्या दक्षतेबाबत दिलेल्या मार्गदर्शनानुसार विशेष लेखापरीक्षण करणे.

**नियामक संरचना/चौकट :**

१. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० (सुधारित २०१३), मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा नियम १९३१, स्थानिक निधी लेखा कार्यालयीन नियमपुस्तिका, १९६४ व महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्र.स्थानिले-१०१०/ प्र.क्र.२६(ब)विमा प्रशासन, दिनांक ३१ मार्च २०११ मधील केंद्रीय वित्त आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ नुसार जिल्हा परिषदा, पंचायत समित्यांचे लेखापरीक्षण केले जाते.

२. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८, महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम १९६०, महाराष्ट्र ग्रामपंचायत (लेखापरीक्षा) नियम, १९६१ व महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखासंहिता, २०११ नुसार ग्रामपंचायतींचे लेखापरीक्षण केले जाते.

३. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखापरीक्षण महानगरपालिका अधिनियम, १९४९ व त्यामध्ये झालेली सुधारणा २०११, महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्र.स्थानिले-१०१०/प्र.क्र.२६(ब) विमा प्रशासन, दिनांक ३१ मार्च २०११, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम, १९६५ व त्यामधील वेळोवेळी झालेल्या सुधारणांनुसार, केंद्रीय वित्त आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार लेखापरीक्षण केले जाते.

४. ग्रामपंचायतीला मिळणाऱ्या PESA या निधीचे आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र. पेसा अ/२०१७ / प्र.क्र. १४४/ का-१७, दिनांक ०४ ऑक्टोबर २०१७ नुसार लेखापरीक्षण केले जाते.

५. संकीर्ण संस्थांचे लेखापरीक्षण संबंधित संस्थांचे अधिनियम/ नियम व शासनाचे वित्तीय नियमानुसार केले जाते.

**४. स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाद्वारे खालील संस्थांचे लेखापरीक्षण केले जाते :—**

| अ. क्र. | वर्गवारी | लेखापरीक्षा संस्थाचे प्रकार | संस्थाची संख्या |
|---|---|---|---|
| १ | पंचायती राज संस्था | जिल्हा परिषद | ३४ |
| २ | | पंचायत समिती | ३५१ |
| ३ | | ग्रामपंचायती | २७९४४ |
| ४ | नागरी स्थानिक स्वराज्य संस्था | नगर पंचायती | १४५ |
| ५ | | नगरपालिका | २४७ |
| ६ | | महानगरपालिका | २९ |
| ७ | | महानगरपालिका परिवहन उपक्रम | ६ |
| ८ | संकीर्ण संस्था | कृषि विद्यापीठे | ४ (अंतर्गत २५६ संस्था) |
| ९ | | महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ | १ (अंतर्गत १६ संस्था) |
| १० | | इतर संकीर्ण संस्था ( महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांसह) | २२८ |
| | **एकूण** | | **२८९८९** |

**लेखापरीक्षण प्रक्रिया :—**

स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखापरीक्षण हे नियुक्त केलेल्या संस्थेच्या लगतच्या मागील आर्थिक वर्षाचे वार्षिक नियोजन करून केले जाते.

जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि नगरपरिषदांच्या तपशिलवार लेखापरीक्षणासाठी मार्च महिन्याचे व्यवहार अनिवार्य आणि कोणतेही दोन महिन्यांची यादृच्छिक निवड करून तपशिलवार लेखापरीक्षण केले जाते, उर्वरित कालावधीसाठी आर्थिक व्यवहारांचा सर्वसाधारण आढावा घेतला जातो.

ग्रामपंचायतींसाठी प्रत्येक महिन्याच्या व्यवहारांचे तपशिलवार लेखापरीक्षण केले जाते. महानगरपालिकांसाठी एका महिन्याच्या व्यवहारांचे तपशिलवार लेखापरीक्षण केले जाते आणि उर्वरित कालावधीतील आर्थिक व्यवहारांचा सर्वसाधारण आढावा घेतला जातो. राज्य आणि केंद्र सरकारकडून महापालिकांना मिळणाऱ्या अनुदानाशी संबंधित खर्चाचे तपशिलवार लेखापरीक्षणही दरवर्षी केले जाते.

संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाद्वारे केले जाणारे लेखापरीक्षण हे आर्थिक/अनुपालन लेखापरीक्षण असते. ज्यामध्ये अपहार, दुर्विनियोग किंवा अफरातफर यावर विशेष भर असतो.

**लेखापरीक्षण वार्षिक नियोजन :—**

स्थानिक निधी लेखा परीक्षण विभागाद्वारे लेखापरीक्षण करण्यात येणाऱ्या संस्थांचे लेखा परीक्षण पुढीलप्रमाणे वार्षिक नियोजन करण्यात येते.

१. माहे जुलै ते सप्टेंबर :- जिल्हा परिषद व पंचायत समिती

२. माहे ऑक्टोबर :- नगरपालिका, नगरपंचायत आणि नगरपालिका शिक्षण मंडळ

३. माहे नोव्हेंबर :- संकीर्ण संस्था

४. माहे डिसेंबर ते जून :- ग्रामपंचायत

**लेखापरीक्षणा दरम्यान आढळलेली लबाडी व अपहार प्रकरणे :—**

संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षाविभागाद्वारे निर्गमित केलेल्या लेखापरीक्षण अहवालात खालील प्रमाणे लबाडी व अपहार प्रकरणे आढळलेली आहेत :—

| अनु. क्र. | तपशील | २०२३-२०२४ | | २०२४-२०२५ | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रकरणे | रक्कम (रुपयांत) | प्रकरणे | रक्कम (रुपयांत) |
| १ | सुरूवातीची शिल्लक | ३९५४८ | ६०६५६३४०६९ | ४०८०३ | ८४४५३१४७३३ |
| २ | नवीन प्रकरणे | १३९२ | २४२८६१३५९६ | ९७१ | ३९८६००३६७ |
| ३ | एकूण प्रकरणे | ४०९४० | ८४९४२४७६६५ | ४१७७४ | ८८४३९१५१०० |
| ४ | निकाली निघालेली प्रकरणे | १३७ | ४८९३२९३२ | ३६ | १५८१०४९८ |
| ५ | प्रलंबित प्रकरणे | ४०८०३ | ८४४५३१४७३३ | ४१७३८ | ८८२८१०४६०२ |

**टीप :—** सन २०२४-२५ वर्षाची माहिती सप्टेंबर, २०२४ पर्यंतची आहे.

**(ब) लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवाल :**

**(I) पंचायती राज संस्थांच्या लेखापरीक्षणाचा लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवाल :**

स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाद्वारे पंचायती राज संस्थाच्या वार्षिक लेखापरीक्षण अहवालांच्या आधारे पंचायती राज संस्थावरील लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवाल संकलित केला जातो. गंभीर चुकांवर आणि अनियमिततेवर विशेष लक्ष केंद्रित करून पंचायती राज संस्थांच्या आर्थिक स्थितीचे सर्वसमावेशक विश्लेषण या अहवालात असते. हा अहवाल स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाद्वारे दर वर्षी ग्रामविकास विभागाला सादर केला जातो जो प्रतीवर्षी ग्रामविकास विभाग महाराष्ट्र विधिमंडळासमोर ठेवते. सन २०१९-२०२० साठी पंचायती राज संस्थाचा लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालास राज्य विधानमंडळाकडून मान्यता देण्यात आली आहे.

सन २०२०-२१ साठी पंचायती राज संस्थाचा लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवाल ग्रामविकास विभागाला सादर करण्यात आला आहे. तसेच सन २०२१-२२ चा लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

**(II) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवाल :**

स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाद्वारे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवाल तयार केले जातात, ज्यामध्ये गंभीर चुकांवर आणि अनियमिततेवर विशेष लक्ष केंद्रित करून त्यांच्या आर्थिक कामकाजाचे व्यापक विश्लेषण दिले जाते. हा अहवाल स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाद्वारे नगरविकास विभागाकडे सादर करून तो महाराष्ट्र विधीमंडळासमोर ठेवला जातो. सन २०१४-२०१५ या वर्षाचा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवाल विधीमंडळासमोर ठेवण्यात आला आहे. सन २०१५-१६ चा लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

प्रकरण ४

## आर्थिक वर्ष २०२५-२६ साठीच्या कामाचा आढावा

**(अ) आर्थिक वर्ष २०२५-२६ लेखापरीक्षण करण्यात येणाऱ्या संस्थांचा तपशील :**

(प्रलंबित लेखापरीक्षणासह)

| अ. क्र. | संस्था | वित्तीय वर्ष २०२४-२५ मधील लेखापरीक्षणाचे प्रलं-बित घटक | वित्तीय वर्ष २०२५-२०२६ मधील संभाव्य नियमित लेखा परीक्षण घटक |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद | ३४ | ३४ |
| २ | पंचायत समिती | ३५२ | ३५१ |
| ३ | नगरपालिका | ३९९ | २४७ |
| ४ | नगरपंचायत | २२१ | १४५ |
| ५ | महानगरपालिका | १४६ | २९ |
| ६ | महानगरपालिका परिवहन उपक्रम | ३० | ६ |
| ७ | महानगरपालिका शिक्षण मंडळ | १८ | ० |
| ८ | कृषी विद्यापीठ | १४ | ४ |
| ९ | पशु व मत्स्य विद्यापीठ | ० | १ |
| १० | संकीर्ण संस्था | ५९२ | २२८ |
| | **एकूण** | **१८०६** | **१०४५** |

***टीप.**— सन २०२४-२०२५ वर्षाची माहिती सप्टेंबर, २०२४ पर्यंतची आहे. जिल्हा परिषद हा एक घटक म्हणून गणण्यात आला आहे.

**(ब) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी ग्रामपंचायतींच्या कामाचे घटक :—**

स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाद्वारे ज्या ग्रामपंचायतींचे वार्षिक उत्पन्न रु. २५,०००/- पेक्षा जास्त आहे अशा ग्रामपंचायतींचे लेखापरीक्षण केले जाते. एक वर्षाचे लेखापरीक्षण एक घटक म्हणून मानले जाते. सन २०२३-२०२४ या वर्षासाठी २७९४४ ग्रामपंचायत घटकाचे नियमित लेखापरीक्षण सुरू आहे.

पंचायती राज मंत्रालय, भारत सरकार यांच्या शिफारशीनुसार सन २०२०-२१ या आर्थिक वर्षापासून १४ व्या व १५ व्या वित्त आयोगांतर्गत ग्रामपंचायतीना प्राप्त झालेल्या अनुदानाचे लेखापरीक्षण करण्याकरिता AOL(Audit Online System) या संगणक प्रणालीचा महाराष्ट्र राज्याने स्वीकार केला आहे. त्यानुषंगाने सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरिता १४ व्या व १५ व्या वित्त आयोगांतर्गत प्राप्त अनुदानाचे ९९.१०% ग्रामपंचायत लेखापरीक्षण AOL(Audit Online System) संगणक प्रणालीवर पूर्ण केले आहे. तसेच सन २०२३-२४ चे ग्रामपंचायत लेखापरीक्षण AOL(Audit Online System) संगणक प्रणालीवर प्रगती पथावर असून डिसेंबर, २०२४ अखेर ३७.३० % एवढे पूर्ण झाले आहे.

**वार्षिक उत्पन्नानुसार लेखापरीक्षण करावयाच्या ग्रामपंचायतींची संख्या दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे आहे :—**

| अ. क्र. | ग्रामपंचायतीचे वार्षिक उत्पन्न | २०२५-२०२६ मध्ये लेखापरीक्षण करण्यात येणाऱ्या ग्रामपंचायतींची संख्या |
|---|---|---|
| १ | उत्पन्न रुपये .२५,०००/- ते रु ७५,००,०००/- | २१३१४ |
| २ | उत्पन्न रुपये ७५,००,०००/- पेक्षा जास्त | ६६३० |
| | **एकूण** | **२७९४४** |

**(क) सशुल्क लेखापरीक्षण संस्था :**

मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३०, त्यानंतरच्या सुधारणा आणि महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखापरीक्षण नियम, १९६१ मधील तरतुदी अंतर्गत समाविष्ट असलेल्या संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी कोणतेही लेखापरीक्षा शुल्क आकारले जात नाही. तथापि, महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार संकीर्ण संस्थांचे सशुल्क लेखापरीक्षण केले जाते. वित्त विभागाचे परिपत्रक क्र. संकीर्ण -२०१९/प्र. क्र.३९/कोषा प्रशा ४, दिनांक ०२ ऑगस्ट २०१९ नुसार संकीर्ण संस्थांचे लेखापरीक्षणाकरिता शुल्क निर्धारीत केले आहे. त्यानुसार संबंधित लेखापरीक्षण झालेल्या सशुल्क संस्थेस शुल्क आकारले जाते. तथापि स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाला पुढील संस्थांकडून आकारण्यात आलेले एकूण लेखापरीक्षण शुल्क अद्याप प्राप्त झालेले नाही.

**संकीर्ण संस्थांकडे प्रलंबित असलेले लेखापरीक्षण शुल्क :**

| अ. क्र. | तपशील | २०२३-२०२४ | २०२४-२०२५ |
|---|---|---|---|
| १ | एकूण संस्था | ६९ | ६९ |
| २ | प्रारंभिक प्रलंबित लेखापरीक्षण शुल्क ( रुपयांमध्ये) | ५,७८,४८,६५७ | ५,२०,०१,४२६ |
| ३ | लेखापरीक्षण कालावधीत वसूलपात्र शुल्क ( रुपयांमध्ये) | १,४२,६९,३५६ | ३५,०९,९१९ |
| ४ | एकूण लेखापरीक्षण शुल्क ( २+३ ) ( रुपयांमध्ये) | ७,२१,१८,०१३ | ५,५५,११,३४५ |
| ५ | वसूल केलेले शुल्क ( रुपयांमध्ये) | २,०१,१६,५८७ | १,१५,७२,१३६ |
| ६ | शिल्लक लेखापरीक्षण शुल्क ( ४-५ ) (रुपयांमध्ये) | ५,२०,०१,४२६ | ४,३९,३९,२०९ |

**टीप.—** सन २०२४-२५ वर्षाची माहिती सप्टेंबर, २०२४ पर्यंतची आहे.

**विशेष लेखापरीक्षण :—**

**(अ) जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे विशेष लेखापरीक्षण :**

वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१७/ प्र.क्र.३६/ कोषा. प्रशा-४, दिनांक ३० मे २०१७ अन्वये नगरविकास विभाग/ विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी यांच्याकडून आलेल्या प्रस्तावानंतर मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा नियम, १९३१ च्या नियम क्रमांक १५ नुसार नियमित वार्षिक लेखापरीक्षणाव्यतिरिक्त, पंचायती राज संस्था व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे विशेष लेखापरीक्षण केले जाते.

**सन २०२३-२४ आणि २०२४-२५ या आर्थिक वर्षाची विशेष लेखापरीक्षणाची स्थिती :-(ग्रामपंचायत व्यतिरिक्त)**

| अ.क्र. | तपशिल | विशेष लेखापरीक्षणाचे घटक | | श्रमदिन |
|---|---|---|---|---|
| | | संस्था | घटक | |
| १ | २०२३-२४ | १ | २ | १७७ |
| २ | २०२४-२५ | ३ | ३७ | ३४८ (एका संस्थेचे लेखापरीक्षण प्रगतीत आहे.) |

**टीप.—** सन २०२४-२५ वर्षाची माहिती सप्टेंबर, २०२४ पर्यंतची आहे.

**(ब) ग्रामपंचायतींचे विशेष लेखापरीक्षण :**

महाराष्ट्र ग्रामपंचायत हिशेब तपासणी, १९६१ च्या नियम ८ नुसार व जिल्हाधिकारी किंवा पंचायत समिती किंवा जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीच्या प्रस्तावानुसार वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१७/ प्र.क्र.३६/ कोषा. प्रशा-४, दिनांक ३० मे २०१७ अन्वये ग्रामपंचायत लेख्यांचे विशेष लेखापरीक्षण केले जाते.

**सन २०२३-२४ आणि २०२४-२५ या आर्थिक वर्षात ग्रामपंचायतींच्या विशेष लेखापरीक्षणाची स्थिती :-**

| अ. क्र. | तपशील | विशेष लेखापरीक्षणाचे घटक | | श्रमदिन |
|---|---|---|---|---|
| | | संस्था | घटक | |
| १ | २०२३-२४ | ० | ० | ० |
| २ | २०२४-२५ | १ | ४ | १२६ |

टीप.— सन २०२४-२५ वर्षाची माहिती सप्टेंबर, २०२४ पर्यंतची आहे.

प्रकरण - ५

## ई-गव्हर्नन्सच्या दिशेने

महाराष्ट्र सरकारने सन २०११ मध्ये सरकारी यंत्रणेमध्ये अधिक कार्यक्षमता जबाबदारी आणि पारदर्शकता आणण्यासाठी ई-गव्हर्नन्स धोरण स्वीकारले. त्यानुसार स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाने धोरणाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या आहेत.

**(i) महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा (MahaLFA)**

*www.mahalfa.maharashtra.gov.in :*

हे स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागासाठीचे वेब पोर्टल आहे, या वेब पोर्टलवर विभागाविषयी इतिहास, लेखापरीक्षकाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या, लेखापरीक्षणाची नियमित संरचना, कायदे व नियमावली यासारखी माहिती, नागरिकांची सनद, ज्येष्ठता सूची, रिक्त पदे, बदली आणि पदोन्नतीचे आदेश, माहिती अधिकार अंतर्गत माहिती इ. माहिती नमुद केली आहे.

**(ii) महाराष्ट्र लेखापरीक्षण माहिती प्रणाली: (MAINS)**

*www.mains.maharashtra.gov.in*

लेखापरीक्षण प्रक्रिया स्वयंचलित करण्यासाठी आणि लेखापरीक्षण परिच्छेदाचा संमंक (डेटाबेस) तयार करण्यासाठी ही प्रणाली राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (NIC), पुणे च्या मदतीने विकसित केली आहे. सदर प्रणाली लेखापरीक्षण नियोजनापासून ते लेखापरीक्षण अहवाल तयार करण्यापर्यंत लेखापरीक्षणाची पूर्ण प्रक्रिया स्वयंचलित पद्धतीने करते. तसेच ही प्रणाली लेखापरीक्षणाचे अनुपालन, देखरेख आणि पुनर्विलोकन अहवाल तयार करणेदेखील सुलभ करते. प्रणाली ची मुख्य वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेतः

- यात लेखापरीक्षणाची पूर्व तयारी, लेखापरीक्षण कालावधीत परिच्छेद तयार करणे, लेखापरीक्षणानंतरचे अनुपालन इ. बाबी वर देखरेख करणे समाविष्ट आहे.
- लेखापरीक्षणाचे वेळापत्रक तयार करणे, लेखापरीक्षण परिच्छेद प्रक्रिया, संकलन आणि लेखापरीक्षण अहवाल तयार करण्यासंबंधी ऑनलाइन कार्ये करते. तसेच ऑनलाइन पुनर्विलोकन लेखापरीक्षण अहवाल व त्याचे अनुपालन प्रक्रिया तयार करण्याबाबत नजीकच्या भविष्यात नियोजित केली आहे.
- यामध्ये ऑफलाइन टेम्पलेट्सद्वारे प्रारुप लेखापरीक्षण परिच्छेद तयार करण्याची आणि नंतर प्रणालीवर ऑनलाइन अपलोड करण्याची सुविधा आहे.
- डेटा अपलोड करण्यापूर्वी ( लेखापरीक्षण परिच्छेद ) ऑफलाइन मोडमध्ये Document Verification Utility (DVU) टेम्प्लेटद्वारे प्रक्रिया केली जाते आणि प्रमाणित केली जाते.
- सदर प्रणाली महाराष्ट्र राज्य डेटा केंद्र, चौथा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयासमोर, मुंबई येथून संचालित केली जाते.
- स्थानिक स्वराज्य संस्थांकडून परिच्छेदाचे अनुपालन स्वीकारण्यासाठी L-CAP पोर्टल सक्रिय करण्यात आले आहे.
- पंचायती राज स्वराज्य संस्थांचे लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवाल तयार करण्यासाठी RAR पोर्टल कार्यान्वित करण्यात आले आहे.
- संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य यांनी MAINS प्रणाली विकसित केली आहे. पंचायती राज संस्थांच्या लेखा परीक्षणाचा आढावा अहवाल तयार करण्यासाठी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे परिच्छेदाचे अनुपालन करण्यास मान्यता देण्यासाठी L-CAP पोर्टल व RAR पोर्टलमध्ये SMS सुविधा लागू करण्यात आली आहे.

**(iii) ई स्वाक्षरी (E-sign) :**

स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांनी विकसित केलेल्या MAINS प्रणालीद्वारे संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना आगाऊ लेखापरीक्षण सूचना पत्र, कार्यालयीन आदेश, वार्षिक लेखापरीक्षण अहवाल, अर्धसमास पत्रे इ. ई-स्वाक्षरीद्वारा तयार केले जातात.

**(iv) परिच्छेद अनुपालन पोर्टल :—**

L-CAP (LOCAL FUND COMPLIANCE OF AUDIT PARA)

राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र (NIC), पुणे मार्फत MAINS प्रणालीवर सदर पोर्टल उपलब्ध करून देण्यात आले आहे. या पोर्टलवर, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांनी सन २०१३-२०१४ पासूनचे प्रलंबित परिच्छेदांचे अनुपालन तयार करून प्रलंबित परिच्छेद ऑनलाइन सादर करणे आवश्यक आहे. स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाने MAINS प्रणालीवरील विहित कार्यपध्दतीनुसार, सह-संचालक आणि सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांनी ऑनलाईन प्राप्त झालेल्या अनुपालनावर कारवाई करणे आवश्यक आहे.

L-CAP पोर्टल १२ जिल्ह्यांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर कार्यान्वित करण्यात आले. ०१ नोव्हेंबर २०१९ पासून, L-CAP पोर्टल सर्व जिल्ह्यामध्ये स्वीकारण्यात आले आहे. सर्व जिल्ह्यांतील जिल्हा परिषद, पंचायत समिती कार्यालयांनी २०१३-२०१४ च्या लेखापरीक्षण वर्षातील प्रलंबित परिच्छेद L-CAP PORTAL द्वारे स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालयास सादर करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र (NIC), पुणे यांच्या समन्वयाने जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले असून त्यानुसार प्रलंबित परिच्छेदांचे अनुपालन स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालयाकडून L-CAP PORTAL मार्फत करण्यात येत आहे.

**(v) Audit Online System (AOL): (ऑनलाईन लेखापरीक्षण प्रणाली)**

पंचायती राज मंत्रालय, भारत सरकार यांनी दिनांक १५ एप्रिल २०२० रोजी सर्व राज्यांसोबत व्हिडिओ कॉन्फरन्सिंगचे आयोजन केले आणि १४ व्या वित्त आयोगाच्या शिफारशींवर विशेष भर देवून ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण ऑडिट ऑनलाईन प्रणालीद्वारे करणेबाबत चर्चा केली. त्यानुसार महाराष्ट्र राज्याने वित्तीय वर्ष २०२०-२१ मध्ये AOL प्रणालीचा स्वीकार केला आहे.

पंचायती राज मंत्रालयाने (MoPR) सुरू केलेल्या ई-पंचायत मिशन मोड (e-Panchayat Mission Mode)च्या प्रकल्पांतर्गत पंचायत एंटरप्राइझ सूटचा (Panchayat Enterprise Suite) (PES) एक भाग म्हणून विकसित केलेल्या सामान्य आणि मुक्त स्रोत प्रणाली पैकी एक ऑडिट ऑनलाईन (AOL) प्रणाली आहे. ऑडिट ऑनलाईन(AOL) प्रणाली पंचायतींच्या तिन्ही स्तरांवर जसे की जिल्हा परिषद, गट विभाग (पंचायत समिती) आणि ग्रामपंचायत यांच्या खात्यांचे आर्थिक लेखापरीक्षण सुलभ करते. लेखापरीक्षणाचे समकक्ष विभाग (राज्य महालेखापरीक्षक व स्थानिक निधी लेखापरीक्षा विभाग ) आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्था (ULBs) ऑडिट ऑनलाईन(AOL) प्रणालीच्या प्रक्रियेनुसार अंतर्गत लेखापरीक्षण आणि बाह्य लेखापरीक्षण अशा दोन्ही लेखापरीक्षणासाठी तपशील अभिलेखबध्द करण्याची सुविधा देते. ही आज्ञाप्रणाली (सॉफ्टवेअर) केवळ लेख्यांचे ऑनलाइन आणि ऑफलाइन लेखापरीक्षणच करीत नाही तर लेखापरीक्षणात सामील असलेल्या लेखापरीक्षकांच्या आणि लेखापरीक्षण पथकाच्या संबंधित यादीसह लेखापरीक्षकाच्या मागील लेखापरीक्षण नोंदी ठेवण्याच्या उद्देशाने देखील काम करते. ही प्रणाली एक चांगले वित्तीय लेखापरीक्षणाचे साधन म्हणून काम करते तसेच लेखापरीक्षणाची पारदर्शकता आणि जबाबदारी सुधारते. तसेच माहिती सार्वजनिक अनुक्षेत्र (डोमेन) मध्ये आणि इतर PES अनुप्रयोगांद्वारे वापरण्यासाठी उपलब्ध आहे.

प्रकरण ६

## परिशिष्ट १

## अर्थसंकल्पिय तरतूद

(रुपये हजारात)

| तपशील | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ | | | अर्थसंकल्प २०२४-२५ | | | सुधारलेले अंदाज २०२४-२५ | | | अर्थसंकल्प २०२५-२६ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अनिवार्य | कार्यक्रम | एकूण | अनिवार्य | कार्य-क्रम | एकूण | अनिवार्य | कार्य-क्रम | एकूण | अनिवार्य | कार्यक्रम | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| उद्दीष्ट निहाय वर्गीकरण - वित्त विभाग - मागणी क्रमांक जी -५ २०५४ , कोषागार व लेखा प्रशासन (००) ०९८ - स्थानिक निधी लेखापरीक्षा (००) (०१) मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखापरीक्षा (२०५४०१११) * (अनिवार्य) | | | | | | | | | | | | |
| ०१ वेतन | १०६१३८६ | ० | १०६१३८६ | १२५६७६१ | ० | १२५६७६१ | ११०७१६३ | ० | ११०७१६३ | १२४२६७६ | ० | १२४२६७६ |
| ०२ मजूरी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ०३ अतिकालिक भत्ता | १५ | ० | १५ | १४० | ० | १४० | ३५ | ० | ३५ | २५ | ० | २५ |
| ०६ दूरध्वनी, वीज व पाणी शुल्क | २३९६ | ० | २३९६ | ३३१८ | ० | ३३१८ | २८५५ | ० | २८५५ | ३३१८ | ० | ३३१८ |
| १० कंत्राटी सेवा | १३५९७ | ० | १३५९७ | १३१२९ | ० | १३१२९ | १८०४३ | ० | १८०४३ | १५००० | ० | १५००० |
| ११ देशांतर्गत प्रवास खर्च | १५०१८ | ० | १५०१८ | २३०३९ | ० | २३०३९ | १४५१७ | ० | १४५१७ | २३२३२ | ० | २३२३२ |
| १३ कार्यालयीन खर्च | २२०६० | ० | २२०६० | २८५०९ | ० | २८५०९ | २३३०६ | ० | २३३०६ | २५००० | ० | २५००० |
| १४ भाडे, पट्टी व कर | १५०७४ | ० | १५०७४ | ९९७६ | ० | ९९७६ | ९६३७ | ० | ९६३७ | ९३८१ | ० | ९३८१ |
| १६ प्रकाशने | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १७ संगणक खर्च | १४७२७ | ० | १४७२७ | २०५७७ | ० | २०५७७ | १६४०४ | ० | १६४०४ | २१०१४ | ० | २१०१४ |
| २४ पेट्रोल, तेल व वंगण | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | ३५०० | ० | ३५०० |
| २८ व्यावसायिक सेवा | ० | ० | ० | ५० | ० | ५० | २५ | ० | २५ | ५० | ० | ५० |
| एकूण - ०९८, स्थानिक निधी **लेखापरीक्षा** | **११४४२७३** | **०** | **११४४२७३** | **१३५५४९९** | **०** | **१३५५४९९** | **११९११९८६** | **०** | **११९११९८६** | **१३४३१९६** | **०** | **१३४३१९६** |

परिशिष्ट - २

**पदनिहाय विवरणपत्र**

| अ. क्र. | पदनाम | संवर्ग | वेतनमान | मंजूर पदे | भरलेली पदे (सप्टेंबर, २०२४ अखेर) | रिक्त पदे (सप्टेंबर, २०२४ अखेर ) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | संचालक | संचालक | S-२९ १३११००-२१६६०० | १ | १ | ० |
| २ | सह संचालक | सह संचालक | S-२५ ७८८००-२०९२०० | ८ | ६ | २ |
| ३ | उप संचालक | गट अ (वरिष्ठ) | S-२३ ६७७००-२०८७०० | ४ | ४ | ० |
| ४ | सहाय्यक संचालक | गट अ (कनिष्ठ) | S-२० ५६१००-१७७५०० | ५७ | ३३ | २४ |
| ५ | लेखापरीक्षा अधिकारी | गट ब (राजपत्रित) | S-१६ ४४९००-१४२४०० | ६७ | ६३ | ४ |
| ६ | सहाय्यक लेखापरीक्षा अधिकारी | गट ब (राजपत्रित) | S-१५ ४१८००- १३२३०० | १६१ | ११५ | ४६ |
| ७ | वरिष्ठ लेखापरीक्षक | गट क | S-१३ ३५४००-११२४०० | २०३ | १९० | १३ |
| ८ | कनिष्ठ लेखापरीक्षक | गट क | S-१० २९२००-९२३०० | ६२० | ४१५ | २०५ |
| ९ | लघुलेखक (वरिष्ठ श्रेणी) | गट क | S-१५ ४१८००-१३२३०० | १ | ० | १ |
| १० | लघुलेखक (निम्न श्रेणी) | गट क | S-१४ ३८६०० - १२२८०० | ७ | २ | ५ |
| ११ | लेखापरीक्षा लिपिक | गट क | S-६ १९९००-६३२०० | १५३ | ७५ | ७८ |
| | | | | **१२८२** | **९०४** | **३७८** |
| १२ | वाहन चालक | गट क | S-६ १९९००- ६३२०० | ४३ | ० | ४३ |
| १३ | नाईक / दप्तरी / रोनिओ | गट ड | S-३ १६६००-५२४०० | २० | १३ | ७ |
| १४ | शिपाई | गट ड | S-१ १५०००-४७६०० | ७५ | २८ | ४७ |
| १५ | पहारेकरी | गट ड | S-१ १५००० -४७६०० | ० | ० | ० |
| | | | | **१३८** | **४१** | **९७** |
| | **एकूण** | | | **१४२०** | **९४५** | **४७५** |

**वित्त विभाग शासन निर्णय क्र. सेवाप्र-२०२०/प्र.क्र.१४/कोषा प्रशा-३, दिनांक २२ डिसेंबर २०२१ अन्वये स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाच्या सुधारित आकृतिबंधमंजूर करण्यात आलेला आहे. सदर आकृतीबंधात १२८२ नियमित पदांना मंजुरी देण्यात आली असून वाहन चालक, नाईक/दफ्तरी/रोनिओ, शिपाई हे संवर्ग मृत संवर्ग म्हणून घोषित केले आहेत. सदर पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांची सेवा अधिसंख्य पदावर वर्ग करावयाची असून पद रिक्त झाल्यानंतर बाह्ययंत्रणेद्वारे भरावयाचे आहे.**

परिशिष्ट ३

**कार्यरत महिला अधिकारी/ कर्मचारी यांची सांख्यिकीय माहिती दर्शविणारे विवरणपत्र**

| अ. क्र. | संवर्ग | वर्ष | एकूण कर्मचारी | पुरूष कर्मचारी संख्या | महिला कर्मचारी संख्या | अल्पवयीन मुलींशी विवाह केलेल्या प्रकरणांची संख्या | हुंडा प्रतिबंधक कायद्यानुसार उदभवलेल्या प्रकरणांची संख्या | महिलांच्या लैंगिक छळाबाबतची प्रकरणे कार्यवाही / संख्या | उपाययोजना / केलेली कार्यवाही / शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | गट अ | **२०२३-२०२४** | ४६ | ३६ | १० | ० | ० | ० | - |
| | | **२०२४-२०२५** | ४५ | ३५ | १० | ० | ० | ० | - |
| २ | गट ब (राजपत्रित) | **२०२३-२०२४** | २०६ | १७४ | ३२ | ० | ० | ० | - |
| | | **२०२४-२०२५** | १७२ | १४४ | २८ | ० | ० | ० | - |
| ३ | गट क | **२०२३-२०२४** | ७१५ | ५२१ | १९४ | ० | ० | ० | - |
| | | **२०२४-२०२५** | ६८७ | ४८२ | २०५ | ० | ० | ० | - |
| ४ | गट ड | **२०२३-२०२४** | ४८ | ४२ | ६ | ० | ० | ० | - |
| | | **२०२४-२०२५** | ४१ | ३६ | ५ | ० | ० | ० | - |
| एकूण | | **२०२३-२०२४** | **१०१५** | **७७३** | **२४२** | ० | ० | ० | - |
| | | **२०२४-२०२५** | **९४५** | **६९७** | **२४८** | ० | ० | ० | - |

**टीप.**—सन २०२४-२५ वर्षाची माहिती सप्टेंबर, २०२४ पर्यंतची आहे.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई